मजकुर :—

दिनांक १४/०७/२०२२ रोजी मा. पोलीस आयुक्त, बृहन्मुबई यांच्या आदेशाने **“ Best Detection of the Month ’’**माहे मे—२०२२ या याकरीता खालील नमुद पोलीस ठाणेंची निवड करण्यात आलेली आहे.

## (अ) बेस्ट डिटेक्शन ऑफ दि मंथ मे—२०२२

| | | |
|---|---|---|
| ०१ | दहिसर पोलीस ठाणे, परिमंडळ—१२, मुंबई | गु.र.क्र ७२३/२०२२ कलम ४५४, ३८०, ३४ भा.द.वि. |

—: “ दिवसा घरफोडी ’’:—

गुन्हयाची थोडक्यात हकिकत :— नमुद गुन्हयात दिनांक २०/०४/२०२२ रोजी फिर्यादी श्री. विलास मोतीराम म्हामुणकर, वय ६५ वर्षे, हे सायंकाळी ११.०० वा. चे सुमारास त्यांचे पत्नीसह गोरेगाव येथील त्यांचे नातेवाईकांचे घरी गेले असताना कोणीतरी अज्ञात इसमाने त्यांचे राहते प्लॅटचे बंद दरवजाचे कुलुप तोडुन आत प्रवेश करून प्लॅटमधील लाकडी व लोखंडी कपाट तोडुन त्यातील ७२८ ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने व १.७५ किलो चांदिच्या वस्तु घरफोडी करून चोरी केली म्हणुन गुन्हा दाखल.

| | | |
|---|---|---|
| फिर्यादी | :— | श्री. विलास मोतीराम म्हामुणकर, वय ६५ वर्षे, |
| चोरीस गेलेला माल | :— | १) १९८ ग्रॅम सोने व दिड किलो चांदी व रोख रक्कम एकूण रूपये ६,५९,०००/— रूपये<br>२) फिर्यादी यांचे पुरवणी जबाबानुसार ( ५३० ग्रॅम सोने व एक किलो चांदी एकूण रूपये किंमतीचे १६,२२,००० /—रुपये ) |
| हस्तगत केलेला माल | :— | १) १०,०००/— रूपये किंमतीचा एक ओप्पो कंपीनीचा मोबाईल.<br>२) १००/— कि. चे एक काळया रंगाचे MOTTO कंपनीचे हेल्मेट,<br>३) ५००/— कि. चा एक काळया रंगाचा नोकीया कंपनीचा मोबाईल<br>४) २१, ०० कि. ची ०७ ग्रॅम वजानाची सोन्याचे कानातील फुले १ जोड<br>५) ७८,००० कि. चा २६ ग्रॅम वजनाचा एक सोन्याचा हार<br>६) १५,००० कि.ची ०५ ग्रॅम वजनाची सोन्याची कानातील एक जोड साखळी जु. वा.<br>७) ४२,००० कि. चा १४ ग्रॅम वजनाचा एक सोन्याचा हार<br>८) ३०,००० कि. ची १० ग्रॅम वजनाचे सोन्याचे कानातील एक पुडी जोड<br>९) ३७,५०० रू. कि. चे एकुण १२२५ ग्रॅम वजनाचे चांदिचे तीन ग्लास, एक ताट, दोन समई, दोन निरंजन, दोन पळी चंचुपात्र, एक कॉईन, दोन वाटया, एक मोठा तांब्या, एक छोटा तांब्या, एक अत्तरदानी, एक कुयरी बाउल जु.वा.<br>१०) ६,३९,०००/— कि. ची २१२.२१० ग्रॅम वजानाची सोन्याची लगड.<br>११) ३,००,०००/— कि. ची १००.२५० ग्रॅम वजानाची सोन्याची लगड.<br>**एकुण— १२, ३५,०००/— कि. च्या एकुण ३७४.४६० ग्रॅम सोन्याचे दागिने व दोन लगडी, १२२५ ग्रॅम वजनाच्या चांदिच्या वस्तू, गुन्हयात वापरलेली मो/सा व दोन मोबाईल फोन्स** |
| आरोपी अटक व दिनांक | :— | १) अनंत भिकु कांबळे, वय ५२ वर्षे,<br>२) ज्ञानेश्वर बबन बांगरे, वय— ३७ वर्षे,<br>आरोपी क्र. १) दिनांक ०३/०५/२०२२ रोजी<br>आरोपी क्र. २) दिनांक ०५/०५/२०२२ रोजी |

**तपास कौशल्य :—** सदर गुन्हयाचे घटनास्थळी सी सी टी व्ही कॅमेरा यंत्रणा नव्हती. पोलीस ठाणेचे गुन्हे प्रकटीकरण अधिकारी सपोनि रणजित चव्हाण व पथक यांनी तांत्रीक तपासात नमुद परिसरातील सुमारे ०९ खाजगी इमारतीचें सी सी टी व्ही कॅमेरा यंत्रणांची सलग ०४ दिवस पाहणी केली. व दोन अनोळखी इसमांना निष्पन्न केले. गुन्हेच्या वेळी आरोपीत यांनी दुचाकी व हेल्मेटचा वापर केल्याने त्यांचे वर्णन अस्पष्ट दिसत हाते. गुन्हा करताना पहिला आरोपीत हा एकटाच घटनास्थळाची पाहणी करणेकरीता आला होता. त्यानंतर तो गुन्हा करण्यासाठी दुसऱ्या आरोपीतास आणणेकरीता दहिसर प., मुंबई येथे गेला असल्याचे सी

सी टी व्ही कॅमेरावरून निष्पन्न झाले. परंतु घटनास्थळी सी सी टी व्ही कॅमेरा यंत्रणा तसेच वॉचमन नसल्याने त्याची सांगड घालणे कठीण जात होते. त्यामुळे सदर घटनास्थळ येथुन सेल आय. डी. चा डंप डेटा प्राप्त करण्यात आला.

नमुद गुन्हयाचे तपासादरम्यान दहिसर, बोरीवली, काशिमीरा, कासारवडवली, ठाणे येथील सुमारे ७८ ठीकाणचे सी सी टी व्ही फुटेज पडताळुन यातील पाहिजे अनोळखी आरोपीत यांचे अस्पष्ट फोटो प्राप्त करण्यात आले. तसेच सी सी टी व्ही फुटेजवरून गुन्हयात वापरलेल्या मो/सा चा नोंदणी क्रमांक एम एच ०४ ई ए ००२० हा निष्पन्न केला. सदर मो/सा चे मुळ मालकाची माहिती प्राप्त करून मुलुंड पुर्व, ठाणे येथील पत्ता पडताळला असता नमुद पत्त्यावर वाहनाचे मुळ मालक रहात नसल्याचे दिसुन आले. वाहन मालकाचे नावाने असलेले सिम कार्डची माहिती प्राप्त केली व त्यावरून वाहन मालक हा मुलुंड प., येथे रहात असल्याचे समजलेने सदर पत्त्यावर जावुन मो/सा चे मुळ मालकाकडे तपास केला असता त्यांनी गुन्हयात वापरलेले वाहन हे सुमारे ०७ वर्षापुर्वी ओ एल एक्स या ॲप मार्फत विक्री केल्याचे सांगुन त्यांना वाहन विक्री केलेल्या इसमाची माहिती आठवत नसल्याचे त्यांनी सांगितले.

सदर वाहनावर वाहतुक विभागाने केलेली कारवाईचे चलन पडताळले असता त्यामध्ये संपर्क क्रमांक मिळुन आला नाही. तसेच वाहनाची पी यु सी ची माहिती घेतली असता माहे डीसेंबर २०२१ मध्ये वाहनाची पी यु सी ही ठाणे येथील एका पी यु सी सेंटर मधुन केली असल्याची माहिती प्राप्त केली. तदनंतर सदर पी यु सी सेंटर येथे जावुन तेथील नोंदणी रजिस्टर पडताळले असता वाहनाची पी यु सी करताना दिलेला संपर्क क्रमांक चुकीचा असल्याचे आढळुन आले. तदनंतर पो.नि संजय बांगर (गुन्हे) व सपोनि चव्हाण यांनी सी सी टी व्ही फुटेजमधील मधील प्राप्त फोटो व डंप डेटाचे तांत्रिक तपासाव्दारे गुप्त बातमीव्दाराबाबत गोपनिय माहिती प्राप्त करून यातील आरोपीत यांची ओळख निष्पन्न केली.

तदनंतर सपोनि चव्हाण व पथक यांनी यातील आरोपीत नामे अनुक्रमे १) अनंत भिकु कांबळे, वय ५२ वर्षे, यास करसई, ता. म्हसळा, जि. रायगड व आरोपीत क्र. २) ज्ञानेश्वर बबन बांगरे, वय— ३७ वर्षे, यास गाव तामसी, ता. जि. वाशिम येथुन अटक करून गुन्हा उघडकीस आणला. तसेच नमुद गुन्हयाचे तपासादरम्यान अटक आरोपीत यांचे कडुन एकुण— १२, ५३, १०० रू. किचे ३७४. ४६० ग्रॅम सोने व १२२५ ग्रॅम चांदिच्या वस्तु, गुन्हयात वापरलेले वाहन व मोबाईल हस्तगत करण्यात आले. नमूद आरोपीत यांचा पुर्व इतिहास पाहता त्यांचेवर नवी मुंबई परिसरात घरफोडी व चोरीचे २६ गुन्हे दाखल आहेत. आरोपीत हे सी.सी.टी.व्ही. व वॉचमन नसलेल्या इमारतीची टेहळणी करून दिवसा ११ ते १५ वा. चे दरम्यान बंद घराचे दरवाजाचा कडीकोयंडा तोडून घरफोडी करतात.

सदरची कामगिरी मा. श्री. विरेंद्र मिश्र सो., अपर पोलीस आयुक्त, उत्तर प्रादेशिक विभाग, मुंबई, मा. श्री. सोमनाथ घार्गे सो., पोलीस उप आयुक्त, परिमंडळ १२, मुंबई व मा. श्री. वसंत पिंगळे सो., सहाय्यक पोलीस आयुक्त, दहिसर विभाग, मुंबई यांच्या मार्गदर्शनाखाली, दहिसर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक प्रविण पाटील, पोलीस निरीक्षक संजय बांगर (गुन्हे), यांचे मार्गदर्शनान्वये गुन्हे प्रकटीकरण अधिकारी स.पो.नि. रणजित चव्हाण, व पथक यांनी सी.सी.टि.व्हि. फुटेज व तांत्रीक बाबीचा उत्कृष्ठ प्रकारे वापर करून सदरचा गुन्हा उघडकीस आणला आहे.

दहिसर पोलीस ठाणे, परिमंडळ —११, मुंबई **तपासी पथकातील पोलीस अधिकारी व अंमलदार**

| अ.क्र. | पदनाम | पोलीस अधिकारी/ कर्मचा—याचे नाव | बक्षिसाचा तपशिल |
|---|---|---|---|
| ०१ | पोलीस निरीक्षक | संजय बांगर | प्रशस्तीपत्रक |
| ०२ | सहाय्यक पोलीस निरीक्षक | रणजित चव्हाण | प्रशस्तीपत्रक |
| ०३ | सहाय्यक पोलीस निरीक्षक | धनराज कि. चौधरी | प्रशस्तीपत्रक |
| ०४ | पो.ह.क्र. ३२३५५ | परब | प्रशस्तीपत्रक |
| ०५ | पो.ह.क्र. ३३५५५ | नार्वेकर | प्रशस्तीपत्रक |
| ०६ | पो.शि.क्र. ११.१३२६ | सांगळे , | प्रशस्तीपत्रक |
| ०७ | पो.शि.क्र.११.१९०२ | सालकर | प्रशस्तीपत्रक |
| ०८ | पो.शि.क्र.११.३५९० | कोल्हा | प्रशस्तीपत्रक |
| ०९ | पो.शि.क्र.११.०३७७ | कांबळे | प्रशस्तीपत्रक |
| १० | पो.शि.क्र.१३.००९७ | चितळकर | प्रशस्तीपत्रक |

..........****..........

मजकुर :—

दिनांक १४/०७/२०२२ रोजी मा. पोलीस आयुक्त, बृहन्मुबई यांच्या '' **BEST CONVICTION OF THE MONTH "** माहे मे २०२२ या याकरीता खालील नमुद पोलीस ठाणेंची निवड करण्यात आलेली आहे.

**(ब) बेस्ट कनव्हिक्शन ऑफ दि मंथ जानेवारी— २०२२**

| | | |
|---|---|---|
| ०१ | शिवाजी नगर पोलीस ठाणे, मुंबई, परिमंडळ—६ | गु.र.क्र. ४१४/१५ कलम—३०२, १४३, १४४, १४७, १४८, १४९, १२०(ब) भादवि. सह ४, २५ भाहका सह कलम ३(१) (अ), ३(२), ३(४) महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम सन १९९९ |

—: ' वीज चोरीच्या धंद्यामध्ये वर्चस्व प्रस्थपित करण्याकरीता खुन ':—

गुन्हयाची थोडक्यात हकिकत :— नमुद गुन्हयात अबुबकर उर्फ बगळा रईस अन्सारी याने अटक आरोपीत इसम मो.जैद अलीमुददीन शेख व साबीर इक्बाल सय्यद तसेच पाहिजे आरोपी सलीक नसीम सिध्दीकी, आणि इतर दोन अनोळखी साथीदारांची संघटित टोळी निर्माण केली.

तसेच बैगणंवाडी, गोवंडी येथील वीज चोरीच्या धंद्या संदर्भात इसम करीम उर्फ राकेश समयदीन चौधरी, वय २७ वर्षे, याचे बरोबर असलेल्या वैमनस्यातुन त्यास वीज चोरीच्या धंद्यातुन नेस्तनाबुत करून सदरचा धंदा आपल्याकडे वळवुन आर्थिक फायदा मिळण्याच्या उददेशाने व वीज चोरीच्या धंद्यामध्ये वर्चस्व प्रस्थपित करण्याकरीता दिनांक १५/०८/२०१५ रोजी १६.४५ वाजताचे सुमारास तलवार, चॉपर व धारदार शस्त्राने जिवघेणा हल्ला करुन जिवे ठार मारले म्हणुन गुन्हा नोंद..

| | | |
|---|---|---|
| फिर्यादी | :— | श्री.साजीद मोहम्मद सिध्दीकी, वय २७ वर्षे |
| बळीत व्यक्ती | :— | करीम उर्फ राकेश समयदीन चौधरी, वय २७ वर्षे, |
| निकाल दिनांक | :— | दि.१९/०५/२०२२ रोजी |
| अटक आरोपी व अटक दिनांक | :— | १) साबीर इक्बाल सय्यद वय २० वर्षे,<br>२) मोहमद जैद अलीमुददीन शेख वय २२ वर्षे<br>**अटक आरोपी.क्र.१ दिनांक १६/०८/२०१५ रोजी**<br>**अटक आरोपी.क्र.२ दिनांक १७/०८/२०१५ रोजी** |
| दोषसिध्दीचा तपशील | :— | यातील नमुद आरोपीतांना मा.विशेष मोक्का कोर्ट क्र.२५, मुंबई यांनी<br>१) कलम ३०२, १४९ भा.दं.वि. अन्वये दोघांना आजन्म कारावास, व रू १० हजार द्रव्यदंडाची शिक्षा.<br>२) कलम १४३ भा.दं.वि. अन्वये दोघांना सहा महिने व रू ५ हजार दंड,<br>३) कलम १४७ भा.दं.वि. अन्वये दोघांना २ वर्षे व ५ हजार दंड,<br>४) मोक्का कायदा कलम ३(१) (प) अन्वये दोघांना आजन्म कारावास व रू १ लाख दंड,<br>५) मोक्का कायदा कलम ३(२) अन्वये दोघांना दहा वर्षे व ५ लाख रू प्रत्येकी दंड,<br>६) मोक्का कायदा कलम ३(४) अन्वये दोघांना दहा वर्षे व ५ लाख रू प्रत्येकी दंड, |

तपास कौशल्य :— नमुद गुन्हयात यातील आरोपीतांनी संघटित टोळी निर्माण करून त्याने बैगणंवाडी, गोवंडी येथील वीज चोरीच्या धंदा आपल्याकडे वळवुन आर्थिक फायदा मिळण्याच्या उददेशाने व वीज चोरीच्या धंद्यामध्ये त्यांचे वर्चस्व प्रस्थपित करण्याकरीता बळीत इसम करीम समयदीन चौधरी यास दिनांक १५/०८/२०१५ रोजी तलवार, चॉपर व धारदार शस्त्राने जिवघेणा हल्ला करुन जिवे ठार मारले आहे.

नमुद गुन्हयात यातील प्रत्यक्षदर्शी साक्षीदार यांचे जबाब नोंद करून, आरोपीतास अटक

करून त्यांचेविरूध्द दोषारोपपत्र दाखल करून, तसेच नमुद गुन्हयात साक्षीदार यांना वेळेवर मा. न्यायालयात हजर करणारे समन्स, वॉरंट स्टाफ, न्यायालयीन कामकाज पाहणारे अधिकारी व अंमलदार यांनी योग्य प्रकारे साक्षीपुरावे मा.न्यायालया समक्ष हजर केल्याने संघटित गुन्हेगारांची टोळी तयार करून करण्यात आलेला खुनाचा गुन्हा न्यायालयात सिध्द करण्यात आला आहे.

शिवाजी नगर पोलीस ठाणे, तपास पथकातील अधिकारी व अंमलदारांचे नावे

| अ. क्र. | पदनाम | पोलीस अधिकारी/ कर्मचा—याचे नाव | बक्षिसाचा तपशिल |
|---|---|---|---|
| ०१ | वरिष्ठ पोलीस निरीक्षक | श्री. अर्जुन रजाने | प्रशस्तीपत्रक |
| ०२ | पोलीस निरीक्षक | श्री. रविंद्र होवाळे | प्रशस्तीपत्रक |
| ०३ | पोलीस निरीक्षक | श्री इक्बाल शिकलगार, | |
| ०४ | सहाय्यक पोलीस निरीक्षक | नितीन चव्हाण, | प्रशस्तीपत्रक |
| ०५ | पोलीस उप निरीक्षक | कडु | प्रशस्तीपत्रक |
| ०६ | पो.ह.क्र.९७०५३८ | बापुराव उगलमुगले | प्रशस्तीपत्रक |
| ०७ | पो.ह.क्र.९८०५४२/ | शिवाजी वायदंडे | प्रशस्तीपत्रक |
| ०८ | पो.शि.क्र.१४०११५/ | सचिन कुरे | प्रशस्तीपत्रक |

.................................................****.................................................

| ०७ | दहिसर पोलीस ठाणे, मुंबई, परिमंडळ–१२ | गु.र.क्र. ४५७/१२ कलम ३०२, ३६४, २०१, ३२४, ५०४, ५०६, ३४ भादविस |
|---|---|---|

–: ' चारीऱ्यावर संशय घेवून अपहरण करुन खून ':–

<u>गुन्हयाची थोडक्यात हकिकत</u> :– नमुद गुन्हयात आरोपीतांनी संगणमताने इसम नामे भावेश धरमदत्त शुक्ला, यांचे अपहरण करून विरार पोलीस ठाणे हद्दीत घेवून जावून जिवे ठार मारले. म्हणुन गुन्हा नोंद..

| | | |
|---|---|---|
| फिर्यादी | :– | सौ. शिवानी संजय सिंग, वय ३५ वर्षे |
| बळीत व्यक्ती | :– | महेश धरमदत्त शुक्ला, वय ४० वर्षे |
| निकाल दिनांक | :– | दि.३०/०५/२०२२ रोजी |
| अटक आरोपी व अटक दिनांक | :– | १.जयेश जितनारायण सिंग, उर्फ बच्ची वय ३२ वर्षे,<br>२. विशाल जसवंतभाई सोलंकी, वय २३ वर्षे,<br>३.जिग्नेश गोविंदभाई नंदवाना वय २७ वर्षे<br>४. अजय जितनारायण सिंग, वय ३५ वर्षे,<br>५. राजकुमार रामपाल यादव, वय २५ वर्षे<br>आरोपी क्र. १ व २ (अटक दि. २०/१२/१२ )<br>आरोपी क्र. ३ व ४ (अटक दि. २६/१२/१२ )<br>आरोपी क्र. ५ (अटक दि.२८/१२/१२ ) |
| दोषसिध्दीचा तपशील | :– | सदर गुन्हयात मा. सत्र न्यायालय, बोरीवली विभाग, दिंडोशी, गोरेगाव (<br>मुंबई यांनी आरोपीतास दि. ३०/०५/२२ रोजी दोषी ठरवून<br>१) कलम ३०२ भादविस अंतर्गत आजिवन कारावास व रू. ७,०००/- दंड, दंड न भल्यास १ वर्षे सक्त मजुरी<br>२) कलम ३६४,३४ भादविस अंतर्गत १० वर्षे सक्त मजुरी व रू. ५०००/– दंड, दंड न भल्यास १ वर्षे सक्त मजुरी<br>३) कलम २०१,३४ भादविस अंतर्गत ३ वर्षे सक्त मजुरी व रू. ३०००/– दंड, दंड न भल्यास ६ महीने सक्त मजुरी<br>४) कलम ५०६ (२) भादविस अंतर्गत २ वर्षे सक्त मजुरी अशी शिक्षा सुनावली आहे. |

<u>तपास कौशल्य</u> :– नमुद गुन्हयात दिनांक १७/१२/२०१२ रोजी रात्रौ फिर्यादी पोलीस ठाणेस हजर झाल्यानंतर त्यांचा पुरवणी जबाब व अपहृत व्यक्ती (मयत इसम) महेश शुक्ला याचा भाऊ भावेश धर्मदत्त शुक्ला यांचा सविस्तर जबाब नोंद केला असता सदर गुन्हयात कलम ३६३ भादविस वाढ करण्यात आले. मयताचा भाऊ व फिर्यादी यांनी त्यांच्या जबाबामध्ये वर नमूद अटक आरोपी व त्यांचे साथीदार १) जयेश जितनारायण सिंग, २) अजय जितनारायण सिंग, ३) विशाल सोलंकी, ४) जिग्नेश नंदवाना, ५) राजकुमार रामपाल यादव यांनी मयत इसम महेश शुक्ला यास बेस बॉलच्या बॅटने मारुन त्याचा गळा आवळून त्यास जिवे ठार मारुन त्याचा मृतदेह इनोव्हा गाडी क्र. MH-04-DR-५८६९ मध्ये टाकून विरार पोलीस ठाणेचे हद्दीत झाडाझुडूपात टाकून दिला.

सदर अनोळखी मृत इसमाचा बिनतारी संदेश प्रसारीत करुन तसेच सदर मृतदेहाचा ओळख पटविण्याकरीता मुंबईमध्ये तसेच ठाणे जिल्हयातील प्रत्येक पोलीस ठाणेस लेखी पत्राद्वारे कळविले व त्याबाबत विरार पोलीस ठाणेस गु.र.क्र. ५०३/१२ कलम ३०२,२०१ भादवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून मयत इसम महेश धर्मदत्त शुक्ला याचा मृतदेह पाहण्याकरीता मयताचा भाऊ भावेश यास पोलीस पथकासोबत पाठविले असता मयताचा मृतदेह मयताचा भाऊ भावेश शुक्ला याने ओळखला. त्यानुसार मृतदेहाचा भावेश शुक्ला याचे ताब्यात देवून अंत्यविधीकरीता दहिसर पोलीस ठाणेचे ना–हरकत प्रमाणपत्र देण्यात आल्यानंतर विरार पोलीस ठाण्यातील नोंद गुन्हयाचे कागदपत्र मागविण्यात येवून सदर गुन्हयामध्ये भादविस कलम ३०२,२०१ अन्वये वाढ करण्यात आलेली आहे.

सदरचा गुन्हा नोंद झाल्यानतंर आरोपीतांस अटक करण्यात आली. आरोपीतास दोषसिध्दी व शिक्षा मिळावी याकरिता तपासी अधिकारी व पथकाने गुन्हयाचे गांभीर्य ओळखून घटनास्थळा वरील वस्तूजन्य पुरावे हस्तगत केले. तसेच जास्तीत जास्त साक्षीदार जबाब नोंद करण्यात आले, आवश्यक ती सर्व वैद्यकीय प्रमाणपत्रे व हस्तगत पुरावे मिळवून विहीत वेळेत आरोपीतांविरूध्द दोषारोप पत्र मा. न्यायालयात सादर करण्यात आले. वरिष्ठ पोलीस निरीक्षक, पोलीस निरीक्षक गुन्हे, पैरवी अधिकारी, कोर्ट कारकून व समन्स वॉरंट अंमलदार यांनी नमूद गुन्हयातील आवश्यक अहवाल पाठपुरावा करून प्राप्त करून घेतला.

तसेच न्यायालयीन प्रक्रिया चालू असताना प्रत्येक सुनावणीच्यावेळी साक्षीदार, पंच, वैद्यकीय अधिकारी यांना वरिष्ठ पोलीस निरीक्षक, पोलीस निरीक्षक गुन्हे व पैरवी अधिकारी यांनी मार्गदर्शन केले व मा. न्यायालयासमक्ष सकारात्मक साक्ष देण्यास प्रोत्साहीत केले. तसेच वेळोवेळी वरिष्ठ पोलीस निरीक्षक, पोलीस निरीक्षक गुन्हे, पैरवी अधिकारी यांनी पोलीस निरीक्षक गुन्हे लेखनिक, कोर्ट कारकून, समन्स वॉरंट बजावणी करणारे अंमलदार यांच्या मदतीने अशा प्रकारचे निच कृत्य करणाऱ्या आरोपीतांस जास्तीत जास्त शिक्षा होण्याकरीता साक्षीदार यांना विश्वासात घेवून, ते सकारात्मक साक्ष देतील. याकरीता सर्वतोपरी प्रयत्न केले. तसेच सर्व साक्षीपुरावे मा. न्यायालयाच्या पुढे सादर केले, जेणेकरून आरोपीस जास्तीत जास्त शिक्षा होईल, याची दक्षता घेतली.

आरोपीतास शिक्षेपर्यंत पोहचविण्याची उल्लेखनिय कामगिरी हि पोलीस तपास व त्यानंतरच्या न्यायालयीन कामकाजाच्या वेळी वर नमूद पोलीस अधिकारी व कर्मचारी यांनी केली आहे. तसेच जनमानसामध्ये पोलीस दलाची प्रतिमा उंचावून, समाजाचा न्यायव्यवस्थेवरचा विश्वास अबाधित ठेवण्यात यश प्राप्त केले आहे.

अशा प्रकारे दहिसर पोलीस ठाण्याच्याय नमूद पथकाने अथक परिश्रम घेवून नमूद गुन्हयात आरोपीस शिक्षा मिळावी म्हणून प्रयत्न केले..

दहिसर पोलीस ठाणे, तपास पथकातील अधिकारी व अंमलदारांचे नावे

| अ.क्र. | पदनाम | पोलीस अधिकारी/ कर्मचा-याचे नाव | बक्षिसाचा तपशिल |
|---|---|---|---|
| ०१ | वरिष्ठ पोलीस पिरीक्षक | प्रविण पाटील | प्रशस्तीपत्रक |
| ०२ | पोलीस निरीक्षक | संजय बांगर | प्रशस्तीपत्रक |
| ०३ | पोलीस निरीक्षक | गिरीश सारंग | प्रशस्तीपत्रक |
| ०४ | पोलीस उप निरीक्षक | कमलेशमणी पांडे | प्रशस्तीपत्रक |
| ०५ | पो.ह.क्र. ९६०२२४ | संखे | प्रशस्तीपत्रक |
| ०६ | पोनि पोनाक्र. ०३११९२ | पोळ | प्रशस्तीपत्रक |
| ०७ | पो.ना.क्र.०४०८७५ | पटकुरे | प्रशस्तीपत्रक |
| ०८ | मपोशिक्र.०८१६०९ | सातपुते | प्रशस्तीपत्रक |
| ०९ | पो.ना.क्र.०६०६०९ | चिकणे | प्रशस्तीपत्रक |

....................................................****....................................................